दैनिक
जनप्रवास
बातम्यांचा राजा

● मंगळवार, दि. १३ जानेवारी २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये 'राष्ट्रीय युवक दिन' उपक्रमांतर्गत ग्रंथ प्रदर्शन

**कोल्हापूर :** स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त व राष्ट्रीय युवक दिन उपक्रमांतर्गत विवेकानंद महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या वतीने स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ



यांच्या जीवनावरील आधारित ग्रंथप्रदर्शन झाले. याचे उदघाटन सागर वातकर व महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते केले.

ग्रंथ प्रदर्शनात स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जीवनावरील ग्रंथ, नवीन प्रकाशित ग्रंथ ठेवले. या कार्यक्रमास संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्रबंधक एस. के. धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

दैनिक **जनप्रवास** बातम्यांचा राजा

• मंगळवार
दि. १३ जानेवारी २०२६

# तरुणांना आशावादी करणे काळाची गरज


## ताराराणी विद्यापीठाचे सागर वातकर यांचे मत : शिक्षकांनी सजग राहावे

**जनप्रवास : कोल्हापूर**

देशाला महासत्ता करण्यासाठी शिक्षण हा घटक महत्वाचा आहे. हे ओळखून स्वामी विवेकानंदांनी युवकांच्या शिक्षणावर भर दिला. तरुणांना आशावादी बनविणे ही आजच्या काळाची गरज असून शिक्षकांनी सजग समाज निर्मिती करावी, असे प्रतिपादन ताराराणी विद्यापीठाचे प्राध्यापक सागर वातकर यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमधील स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहनिमित्त ते बोलत होते. स्वामी विवेकानंद आणि युवक हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात होते.

व्रातकर म्हणाले, आजचा तरुण हा दिशाहीन आहे. त्याला मार्ग दाखविण्याची आवश्यकता आहे. ज्ञान, भक्ती, वैराग्य आणि विवेक हे विवेकानंदांचे विचार अंगिकारणे गरजेचे आहे. तरुणांनी आपल्या सामर्थ्याची ओळख करुन घेऊन भारतीय संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करणे आवश्यक आहे. भारत देश हा जगद्गुरु व्हायचा असेल तर ज्ञान, विज्ञान व सुसंस्काराने प्रेरित होणारी पिढी निर्माण व्हायला हवी.



**कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सागर वातकर. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, प्रा. अविनाश गायकवाड, डॉ. अस्मिता तपासे आदी.**

अध्यक्षस्थानावरून डॉ. थोरात म्हणाले, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा प्रचार आणि प्रसार स्वामी विवेकानंदांच्या विचारांना अनुसरुन सुरु आहे. शिक्षकांनी स्वामी विवेकानंदांचे विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजवायला हवेत. आत्मानंद शोधण्याचे कसब शिक्षकात आहे. आजचा तरुण संभ्रमावस्थेमध्ये आहे. त्यांनी विवेकानंदांचे विचार अंगिकारुन स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास करावा.

प्रास्ताविक प्रा. अविनाश गायकवाड यांनी केले. आभार डॉ. अस्मिता तपासे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. समीक्षा फराकटे यांनी मानले. या कार्यक्रमाला संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी डॉ. श्रुती जोशी, डॉ. ई. बी. आळवेकर, डॉ. कविता तिवडे, डॉ. राजश्री पाटील, डॉ. प्रदीप पाटील, प्रा. शिल्पा भोसले, प्रा. एम. आर. नवले, प्रा. बी. एस. कोळी, कुलसचिव एस. के. धनवडे आदी उपस्थित होते.

13.1.26